# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३९** **दिनांक : २४/०३/२०२५**

**विभाग** : प्रकल्प विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य २०२४-२०२५ या योजनेच्या भाग -१० अंतर्गत, कार्यरत नोकरदार / कार्यरत महिलांकरिता वसतीगृह बांधणे बाबतचा प्रकल्प राबविणेस मा.शासनाकडे सादर करणे बाबतच्या प्रस्तावास मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार , भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४ -२५ या योजनेच्या भाग - १० अंतर्गत कार्यरत महिलांकरिता वसतीगृह बांधणे बाबत. अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सावेडी गट क्र. २२८/१, २२८/३ अ, २२८/३ अ. पै, २२९/१ब/२, व२२९/१ब/२अ येथील महानगरपालिकेच्या मोकळ्या भुखंडावर नोकरदार /कार्यरत महिलांकरिता वसतीगृह बांधणेबाबत प्रस्ताव मा. शासनाकडेस सादर करावयाचा आहे.

त्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेचे सदर प्रकल्पाकरीता नियुक्त करण्यात आलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार स्पॅनेक्स एईसी सोल्युशन,पुणे सदर प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रके व नकाशे तयार केले आहेत. अंदाजपत्रकीय रक्कम रू २४,३८,०१,६२२/- इतकी आहे. संदर्भ क्र. ३ अन्वये मा. सहाय्यक संचालक यांनी सावेडी गट क्र २२८/१, २२८/३ अ, २२८/३ अ. पै, २२९/१ब/२, व२२९/१ब/२अ या ठिकाणी २०० कार्यरत महिलांकरिता वसतिगृह बांधणेच्या कामाच्या नकाशास बांधकाम परवानगी दिली आहे. तसेच सदर कामाच्याअंदाजपत्रकास शहर अभियंता यांची जा.क्र. ४२८ दि. २१/०३/२०२५ अन्वये तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे.

या प्रकल्पामध्ये तयार करण्यात आलेल्या सविस्तर अंदाजपत्रकामध्ये खालीलप्रमाणे बाबींचा समावेश आहे

१) २०० कार्यरत महिलांकरीता वसतिगृहाची इमारत, वाहनतळ, फूड कोर्ट
२) वसतिगृहाभोवती संरक्षण भिंत
३) विद्युत कामांचे अंदाजपत्रक
४) अग्निशमन व्यवस्था
५) वसतिगृहासाठी आवश्यक ते फर्निचर
६) रॉयल्टी चार्जेस
७) गुणवत्ता नियंत्रण तपासणी शुल्क
८) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क

त्यानुसार सदर योजनेंअतर्गत अर्थसहाय्य मिळविण्यासाठी महानगरपालिकांनी वसतीगृह उभारण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR),मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंट व संक्षिप्त संगणकीय सादरीकरण तयार करून सादर करणेकामी निर्देश प्राप्त आहेत.

मा. केंद्र शासनाच्या वित्त विभागाच्या दि. ०९/०९/२०२४ च्या माननीय संचालक (Director (PF- S)) यांच्या पत्रामध्ये कार्यरत महिलांकरीता वसतिगृह बांधणे बाबत केंद्र शासनाकडून प्रकल्पाकरीता १००% अनुदान उपलब्ध होणार आहे.

सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेनंतर त्याची देखभाल व दुरूस्ती राज्य शासन अथवा स्थानिक स्वराज्य संस्थानी करावी, असे नमूद आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेनंतर मनपामार्फत PPP तत्वावर NGO मार्फत प्रकल्पाची देखभाल व दुरूस्ती करावी व तसा करारानाम्याचा मसुदा मा. शासनाकडेस DPR समावेत संक्षिप्त संगणकीय सादरीकरणासह प्रस्ताव नगरविकास विभागाकडेस सादर करणे आवश्यक आहे.

भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२४ -२५ या योजनेच्या भाग १० अंतर्गत कार्यरत महिलांकरिता वसतीगृह बांधणे बाबत. अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सावेडी गट क्र. २२८/१, २२८/३ अ, २२८/३ अ. पै, २२९/१ब/२, व २२९/१ब/२अ येथील महानगरपालिकेच्या मोकळ्या भुखंडावर नोकरदार /कार्यरत महिलांकरिता वसतीगृह बांधणेबाबतचा प्रकल्प राबविणेस व सदरचा प्रस्ताव मा. शासनाकडेस सादर करणेस तसेच या प्रकल्पाकरीता NGO सोबत मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंट करण्यात करीता मा.उपायुक्त (सा) यांना प्रधिकृत करण्यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१४०** **दिनांक : २४/०३/२०२५**

**विभाग** : नगररचना विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** सं.नं.३१६,३१७,३१९,३२० पै.सावेडी या मंजुर रेखांकनातील डी.पी.रस्त्याचे स्थान बदल (रि-अरेंजमेंट ) करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, श्री.धनंजय कृष्णा जाधव व इतर यांनी सं.नं.३१६,३१७,३१९,३२० पै.सावेडी येथील अंतिम रेखंकनास जा.क्र.टी.पी.७५६५ दि.०३/११/२०१६ अन्वये अंतिम जंजूरी प्राप्त आहे.सदर रेखांकनाचे अंतिम मंजुर आराखडयामध्ये १८.००मी विकास रस्ता दर्शविण्यात आलेला असून OPEN SPACE(प्लॉट क्र.३) १६९१ चौ.मी.दर्शविण्यात आलेली आहे. सदर रेखांकनातील प्लॉट क्र.१,२,६ हे आजअखेर आमचे मालकीचे हक्कत आहेत, मंजुर विकास रस्ता १८.००मी हा आमचे मालकीचे प्लॉट क्र.१,२,६ मधुन जात आहे. सदर विकास रस्ता सद्यस्थित कच्चा स्वरूपात आहे. उक्त रस्ता व प्लॉट क्र.३ मध्ये दर्शविलेला OPEN SPACE याचे सोबत दाखल केलेल्या आराखडयात दर्शविल्यानुसार स्थान बदल करावयाचे आहे. सदर रेखांकनातील प्लॉट क्र.१,२,६ हे आमचे मालकीचे असल्याने सदर (रि-अरेंजमेंट ) मुळै रस्त्याचे अथवा OPEN SPACE चे क्षेत्रामध्ये कोणताही बदल होणार नाही. तरी सं.नं.३१६,३१७,३१९,३२० पै.सावेडी यामधील विकास आराखडयातील १८.०० चौ.मी.रूंद रस्ता व OPEN SPACE ची रि-अरेंजमेंट करणेस मंजुरी मिळावी. मंजुरी नुसार प्रत्यक्ष जागेवर केलेल्या रि- अरेंजमेंट बाबत आराखडे सुधारीत अंतिम मंजुरीस्तव सादर करण्यात येतील याबाबत आम्ही सर्व हमी देत आहेत.

वरील प्रमाणे श्री.धनंजय कृष्णा जाधव व इतर यांनी विकास योजना रस्त्याचे स्थान बदलणे तसेच OPEN SPACE ची रि-अरेंजमेंट करणेस याबाबत मंजुरी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

स्थळ पाहणी अहवाल खालील प्रमाणे

दि.२४/०२/२०२५ रोजी स्थळ पाहणी केली असता असे निदर्शनात येते की, विकास योजने नुसर सदर ठिकाणी १८.०० मी विकास योजना रस्ता (DPरोड) प्रस्तावित करण्यात आलेला आहे. अंतिम रेखांकनानुसार जागेवरती विकास झालेला दिसुन येत आहे. तसेच लागु सर्व्हे नं.१३४ मध्ये व उक्त सर्व्हे नं.३१६ मध्ये पड जमीन दिसून येत आहे. तसेच विकास योजनेतील १८.०० मी.रस्ता हा सर्व्हे नं.१३४ मधील रेखांकना करिता वापरण्यात आलेला नाही. याप्रमाणे दिसुन येत आहे.

मंजुर रेखांकनातील OPEN SPACE हा १०.६८ मीटरनी UDCPR CI No३,४,३ Recreational Open Space Rearrangement नुसार स्थलांतरीत करण्याकरीता सदरील रेखांकन जा.क्र.टी.पी.७५६५ दि.३/११/२०१६ अन्वये अंतिम मंजुरी प्राप्त आहे. उक्त कलमानुसार अंतिम मंजुरी नंतर ४ वर्षा पर्यत किंवा ४ वर्षा नंतर सदरील रेखांकनामधील प्लॉट विक्री झाली नसेल तर सदरील UDCPR CI No३,४,३ नुसार OPEN SPACE Rearrangement करणे अनुज्ञेय आहे. UDCPR CI No२,३ (iv) Discretionary Pawer नुसार विकास योजनेतील रस्ते व जागेच्या परिस्थितीनुसार रस्त्याची अलाईमेंट बदलण्याबाबत प्राप्त अधिकारातून प्रस्तावित १८.०० मी. रस्ता मुळ OPEN SPACE च्या जागेतुन सरळ रेषेमध्ये ३० मी विकास योजना रस्त्याला जोडणे प्रस्तावित करण्यात येत आहेत. सदरील अरेंजमेंट ही स्वत:च्या मालकीच्या जागेमध्ये करण्यात येत आहे.

सदरील रस्ता सुधारीत विकास योजनेमधील १८.०० मी रस्ता आहे. सदरील रस्त्याची अलाईमेंट ही सदरील रेखांकनामध्ये सरळ रेषेमध्ये जोडलेली नाही. सदरील रस्ता हा मुख्य रस्त्यास सरळ रेषेस जोडल्यास वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. तसेच सदर ठिकाणी ग्रेड आयर्न पॅटर्न विकासीत होईल. त्यामुळे सदर ठिकाणी रस्त्याची ऑलईमेंट बदलणे योग्य होईल. सदरील रस्ता विकास योजनेतील असल्याने सदरील सुधारणा करण्या करिता MRTP १९६६ मधील कलम ३७ अन्वये मॉडिफिकेशनचे फेरबदल करण्यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक – ४१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१४१** **दिनांक : २४/०३/२०२५**
**विभाग** : विद्युत विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना -सन २०२४-२५ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील पत्रकार चौक ते संघर्ष चौक ते सह्याद्री चौकापर्यत दिवाबत्तीची व्यवस्था करणे.या कामास मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचेकडेस सादरकरणेस्तव मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत खाली नमुद विकास कामाचा प्रस्ताव सादर करणेबाबत मा.आ.श्री.संग्राम पार्वती अरूणकाका जगताप,विधानसभा सदस्य,महाराष्ट्र राज्य,यांनी सुचित केलेले आहे.

सदर कामाची इतर कोणत्याही शासकीय यंत्रणेस NOC देण्यात आलेली नाही तसेच कामाची व्दीरूक्ती होत नाही याची खात्री करण्यात आलेली आहे. सदर विकास कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील पत्रकार चौक ते संघर्ष ते सह्यादी चौकापर्यत दिवाबत्तीची व्यवस्था करणे | ९९,९५,४०९/- |
| | एकुण | ९९,९५,४०९/- |

वर नमुद विकास कामाचा प्रस्ताव नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना २०२४-२५ अंतर्गत सादर करणे कामी मा.सहा संचालक,नगररचना यांचा अभिप्राय घेणेस व रक्कम रू. ९९,९५,४०९/- (अक्षरी रक्कम रू.नव्यान्नव लाख,पंच्यान्नोहजार चारशे नउ मात्र) खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर (न.पा.) यांचेकडेस सादर करणेस मा.प्रशासक महासभा यांची मंजुरी देण्यात येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१४२** **दिनांक : २४/०३/२०२५**
**विभाग** : सार्व.बांधकाम विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका विविध विभागाअंतर्गत कामांसाठी देयके अदा करण्यासाठी संगणकृत ई मोजमापे व ई देयके प्रणालीचा वापर करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री शंभर दिवस योजना विविध कार्यपध्दती राबवणे अंतर्गत दिलेल्या निर्देशामध्ये ऑफिस तथा ई ऑफिस संगणीकृत करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्या दृष्टीने अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये प्रकल्प विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, विदयुत विभाग,तसेच स्टोअर विभाग इत्यादी विभागामार्फत विविध विकास कामे नियमितपणे चालू आहेत. सदर कामे ही प्रचलित सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली नुसार केली जातात. त्यामध्ये प्रथमता नियमानुसार अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्राप्त केलेनंरत प्रशासकीय मान्यतेप्रमाणे तांत्रिक मान्यतेनुसार त्याची शेडयुल बी व निविदा कार्यवाही करणे, निविदा कार्यवाहीनंतर कार्यादेश घेवून प्रत्यक्षात काम करणे,काम प्रगतीत असताना चालू कामाची मोजमापे घेणे व सदरचे नोंदी लेखी स्वरूपात मोजमापे पुस्तकात नोंद करणे व नोंदी केलेल्या एकुण कामांचे ऍब्स्ट्रॅक स्वरूपात देयक तयार करून सार्वजनिक बांधकाम नियमावली तथा नगरपालिका संहिता नियम तक्ता क्रमांक १३१ व १३२ नुसार देयक सादर केले जातात. देयक सादर केल्यानंतर सदरची देयके संगणकृत टायपिंग करून मंजुरीसाठी सादर करून विविध विभागांची मान्यता घेतली जाते. उदारणार्थ - तांत्रिकदृष्टया देयकाची छाननी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता तद्नंतर निधी उपलब्धतेबाबत अर्थ विभागाचा अभिप्राय, प्रभाग अधिकारी यांचा पाहणी अहवाल तसेच केलेल्या कामाचे लेखापरिक्षणासाठी मुख्य लेखापरिक्षक व तद्नंतर अंतिमता मंजुरी मा.आयुक्त किंवा उपायुक्त यांच्या सक्षम प्राधिकरणाकडे सादर करून सदरचे देयक मंजुर केले जाते. सदर देयक मंजूर केलेनंतर अदायगीसाठी मायनेट या सॉफ्टवेअर प्रणालीव्दारे देयक मागणी अहवाल व पेमेंट ऑर्डर जनरेट करून अर्थ विभागास अदायगीसाठी पाठवली जातात. तद्नंतर अर्थ विभाग सदर कागदपत्रांच्या आधारे धनादेश स्वरूपात अथवा आ टी जी एस स्वरूपात वेगळयाने लेखी स्वरूपात मान्यता घेवून ठेकेदारास अदा केली जातात. हा एकुणच कालावधी मोठया स्वरूपात असल्याने व किचकट स्वरूपाचा असल्याने कामाचा उरक होत नाही.

त्या दृष्टीने मुख्यमंत्री शंभर दिवस उपक्रमाच्या उद्दिष्टा मधील तसेच शासन पत्रकातील डिजिटल इंडिया या महाराष्ट्राने अंगीकृत केलेल्या कार्यवाहीनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तीका परिशिष्ट २४ मधील रियल टाईम पध्दतीने लिहिल्या जाव्या यासाठी जनहित याचीका क्रमांक २८/२०१० नुसार मा.उच्च न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते, इमारती, पुल कामांचे संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती करून त्यांनी देखील सदर प्रक्रियेसाठी डिजिटल इंडिया अंतर्गत ही मोजमापे व ई देयके संगणक प्रणाली विससित करून त्याचा वापर करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देश दि.१ मे २०१६ पासून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास लागू राहतील व तद्नंतर प्रचलित पध्दतीप्रमाणे बिल देवू नये असे देखील निर्देश

दिलेले आहेत. सदर सिस्टीम डेव्हलप करताना सिस्टीम इंटिग्रेटर हा संबंधित विभागाने नेमणूक करून सदर नेमणूक केलेला सिस्टीम इंटिग्रेटर हा पुणे किंवा नागपूर येथील नोंदणी केलेला असावा व सार्वजनिक

बांधकाम विभाग यांना प्रवेश ॲक्सेस असावा असे नमूद आहे. तसेच सदर सिस्टीम इंटिग्रेटरने कंत्राटदाराकडून निविदेच्या रकमेच्या ०.२% पेक्षा जास्त रक्कम नसावी असे देखील निर्देश दिलेले आहे. सदरची कार्यपध्दती अहिल्यानगर महानगरपलिकेत प्रथमता वापरण्यात येणार असल्याने सदरचा प्रथम निविदा ही प्रायोगिक तत्वावर जास्ता कालावधीमध्ये देण्याऐवजी प्रथमता एके किंवा दोन वर्षासाठी वापरणे व तद्नंतर योग्य प्रतिसाद व त्रुटी आढळल्यास पुढील निविदा मागवणे किंवा सदर निविदेला मुदतवाढ देणे योग्य वाटते.

उपरोक्त शासन निर्णयामध्ये महत्वाचे म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मोठया स्वरूपात काम असलेले त्यांनी रूपये एक कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या सर्व कामांसाठी व त्यांच्या निविदेस लागू राहतील असे सदर प्रणाली लागू बाबतचे परिपत्रकामध्ये नमुद केलेके आहे. परंतु महानगरपालिकेतील इतक्या मोठया स्वरूपातील कामे कमी असल्याकारणामुळे रूपये दहा लक्ष पेक्षा पुढील सर्व कामांना सदरची प्रणाली राबवणे बाबत रिपोर्ट मंजुर करणे योग्य वाटते तसेच सदरचे होणारे खर्च हे देखील निविदा अंदाजपत्रकामध्ये नमूद करून अंदाजपत्रक मंजुर करणे देखील योग्य वाटते.

त्यानुसार पुणे येथील काही सॉफ्टवेअर कंपनी यांनी मा.आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका यांना सदर प्रणालीबाबत माहिती देण्यात आलेली होती. सदर प्रणाली मध्ये प्राथमिक दृष्टया अंदाजपत्रक तयार करणे पासून ते देयक अंतिम करण्यापर्यत एकत्रित विविध टप्याचे मॉडेल तयार केलेले असून त्यामध्ये प्राथमिक स्तरावर फक्त कार्यादेश झाल्यानंतर ही मेजरमेंट बुक तयार करणे, ई - बिलींग तयार करणे,कॉन्टॅक्ट मॅनेजमेंट वर्क्स मॉनिटरिंग इत्यादी फक्त तातडीने प्राथमिक प्राधान्यने चालू करणे योग्य वाटते.

सदरच्या सॉफ्टवेअर कंपनीकडून अंदाजपत्रकाचे देखील तर प्रणाली सोबत घेतल्यास अंदाजपत्रक देखील वेगाने तयार करणे बाबतची देखील मदत होवू शकते. परंतु त्याकरीता मनपाला सुमारे २० लक्ष अतिरिक्त खर्च करावे लागेल. त्यामुळे मनपाच्या अभियंत्यांचे आउटसोर्सिग किंवा अतिरिक्त भार कमी होईल. परंतु सदरचा सर्व निर्णय धोरणात्मक आहे. त्या वास्तव प्रथमतः शासन परिपत्रक व झालेल्या नियोजनानुसार प्रस्तावासाठी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागवुन किमान देकार प्राप्त होणा-या सॉफ्टवेअर कंपनीकडून नियमानुसार कार्यादेश देवून पुढील योग्य ती कार्यावाहीसाठी प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी तथा योग्य तो अटी - शर्ती नमूद करण्यासाठी रिपोर्ट मान्यतेस सादर तथा ओदशार्थ सादर.

सदर शासन निर्णयामध्ये नागपूर किंवा पुणे यांच्या आय.टी.सी.सी. संस्थेचे मानांकन पाहिजे असे नमुद आहे. त्यानुसार एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मध्ये तसे नमुद करून निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही करणे योग्य वाटते.

अहिल्यानगर महानगरपालिका विविध विभागाअंतर्गत कामांसाठी देयके अदा करण्यासाठी संगणकृत ई - मोजमापे व ई देयके प्रणालीचा वापर करणेस व विभागाच्या प्रस्तावास उपरोक्त प्रमाणे मा.प्रशासक महासभा यांची मंजुरी देण्यात येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |